
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ३/मार्च २०२५

## संपादकीय

### जिनोम इंडिया प्रकल्प

प्रत्येक बाळ जन्माला येतानाच सोबत काही आनुवांशिक गुण घेऊन येते. हे गुण त्याला आईवडिलांकडून मिळालेल्या जनुकाद्वारे प्राप्त होतात. या जनुकातील महत्त्वाचा घटक म्हणजे डीएनए (डिऑक्सी रायबोन्युक्लिक ॲसिड) होय. या डीएनएची रचना कशी असते याचा अभ्यास जेम्स वाटसन आणि फ्रान्सिस क्रीक या जोडीने १९५३ मध्ये सादर केला. या कामासाठी त्यांना १९६२ चे औषधशास्त्राचे नोबेल पारितोषिक देण्यात आले. तेव्हापासून जनुकीय अभ्यासाला चांगलीच गती मिळाली आहे. शास्त्रज्ञांनी या रेणूचा सविस्तर अभ्यास करून त्यांची वैशिष्ट्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या असे लक्षात आले की, या रेणूची रचना सर्पीलाकार असून, त्यात यडेनीन, ग्वानिन, सायटोसईन, आणि थायमीन असे चार आम्लारीधर्मी घटक असतात. त्यातील यडेनीन, थायमीन तसेच ग्वानिन, सायटोसईन एकमेकांशी जोडले जातात. असे जरी असले तरी प्रत्येक व्यक्तीत या जोड्याची संख्या वेगवेगळी असते. ती कशी असते हे समजून घेण्यासाठी विशिष्ट डीनए रेणूचे विश्लेषण करतात. त्यासाठी एक विशिष्ट पद्धत विकसित करण्यात आली आहे.

मनुष्याच्या आनुवंशिक गुणांचा अभ्यास करण्यासाठी जागतिक स्तरावर १९९० मध्ये ह्यूमन जिनोम प्रकल्प घेण्यात आला. यात जगातील अनेक नामवंत संशोधन संस्था सहभागी झाल्या होत्या. या प्रकल्पात हजारो लोकांचे रक्ताचे नमुने घेऊन त्यातील डीएनएचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासाचा अहवाल २००३ मध्ये सादर करण्यात आला. यात प्रामुख्याने अमेरिका, इंग्लंड, जपान, फ्रांस, जर्मनी आणि चीन या देशांतील लोकांचा समावेश होता. भारतातील लोकांना या अभ्यासात सामील करून घेण्यात आले नव्हते. भारतात वेगवेगळ्या जाती-जमातीचे लोक राहतात. इथे जवळच्या नातेवाईकांमध्ये लग्ने होतात. त्याचा जनुकावर काय परिणाम होतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. या सर्व बाबींचा विचार करून भारतासाठी एक स्वतंत्र प्रकल्प घेण्याचे ठरले. त्यासाठी पुरेशा निधीची तरतूद देखील करण्यात आली. सगळ्या औपचारिक बाबी पूर्ण करून भारत सरकारने जिनोम इंडिया प्रकल्प २०२० मध्ये सुरू केला. या प्रकल्पाचे प्रामुख्याने दोन भाग होते. पहिल्या भागात १०,००० व्यक्तींच्या जनुकांचा अभ्यास

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

करण्याचे ठरले. दुसरा भाग हा कॅन्सर, हृदयरोग आणि मानसिक आजाराने त्रस्त असणाऱ्या व्यक्तींच्या जनुकाचा अभ्यास करण्यासाठी राखून ठेवण्यात आला. पाच वर्षांच्या अथक परिश्रमा नंतर प्रकल्पाचा पहिला भाग पूर्ण झाला. २०२५ च्या फेब्रुवारी महिन्यात या प्रकल्पाचे निष्कर्ष जनतेपुढे मांडण्यात आले.


जिनोम इंडिया हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागातील डिपार्टमेंट ऑफ बॉयोटेक्नॉलॉजीने याची धुरा सांभाळली होती. संशोधनाची मुख्य जबाबदारी बंगलुरूमधल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स या संस्थेवर टाकण्यात आली होती. प्रत्यक्ष काम करण्यासाठी देशातील २० संशोधन संस्था आणि विद्यापीठांना समाविष्ट करून घेण्यात आले होते. या संस्थांनी देशाच्या वेगवेगळ्या समाज घटकातून रक्ताचे नमुने गोळा केले आणि त्यातील डीएनएचा सखोल अभ्यास केला. या सगळ्या माहितीचे संकलन करून एक सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. हा अहवाल मुक्तपणे उपलब्ध आहे.

आनुवांशिक जनुकावरून आपला वर्ण, डोळ्यांचा रंग, आपली उंची या बाबी ठरत असतात. त्याचबरोबर व्यक्ती कोणत्या आजाराला बळी पडेल याचा देखील अंदाज बांधता येतो. ही माहिती वैद्यकीय क्षेत्रातील लोकांसाठी फारच महत्त्वाची आहे. भारतात स्वजातीय आणि नातेसंबंधात विवाह करण्याची प्रथा आहे. याचा जनुकावर काय परिणाम होतो हा या अभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. त्यादृष्टीने अभ्यास करण्यात येत आहे. लवकरच त्यांचेही निष्कर्ष उपलब्ध होतील. इंडिया जिनोम प्रकल्पाने खूप माहिती उपलब्ध करून दिली आहे. त्यातून कितीतरी बाबी स्पष्ट होतील. विशेषत: आनुवंशिक आजाराबद्दल आधीच माहिती मिळेल. त्यावर मात करणे सहज शक्य होईल.

शासकीय स्तरावर राबविण्यात आलेल्या जिनोम इंडिया प्रकल्पाची माहिती समाजात पसरणे आवश्यक आहे. हे कार्य देशातील शिक्षण संस्थांनी करावे अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने विद्या प्रसारक मंडळाने एक उपक्रम हाती घेतला. विद्या प्रसारक मंडळाच्या आधिपत्याखाली अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यातील बांदोडकर विज्ञान महाविद्यालय आणि नव्याने स्थापन झालेले अभियांत्रिकी महाविद्यालय या दोन संस्थांनी पुढाकार घेतला. त्यांनी त्यांच्या महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना घेऊन समाज-जागृती करायचे ठरविले. यासाठी त्यांनी तीन मार्ग स्वीकारले. माहिती देणारे पोस्टर, कृतीपर प्रकल्प आणि पथनाट्य. काही विद्यार्थ्यांनी भारतीय जिनोम प्रकल्पाची माहिती देण्यासाठी पोस्टर बनविले आणि ते महाविद्यालय परिसरात लावले. काही जणांनी कृतीतून माहिती देण्यासाठी कृतीपर प्रकल्प बनविले. या प्रकल्पाचे देखील एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. तिसऱ्या गटाने पथनाट्य बसविले आणि ते सादर केले. या सगळ्या प्रयत्नांना चांगले यश आले. महाविद्यालय परिसरातील विद्यार्थी आणि शिक्षक यांनी त्याचा चांगला फायदा घेतला. विशेषत: कला, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही माहिती पूर्णपणे नवीन होती. ती त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात सहभागी विद्यार्थी यशस्वी झाले. असे प्रयत्न इतरही शिक्षण संस्थांनी करावेत असे मी या निमित्ताने सुचवू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष सव्वीसावे/अंक ३/मार्च २०२५

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २९ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | प्रो. सत्येंद्रनाथ बोस यांचे क्वांटम विज्ञानातील मूलभूत योगदान | विदयेश कुलकर्णी | २ |
| ३) | उंटांची अद्भूत रम्य दुनिया २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्सचे वर्ष | सौ. अल्पना बापट | ५ |
| ४) | परिसर वार्ता | संकलित | ९ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# प्रो. सत्येंद्रनाथ बोस यांचे क्वांटम विज्ञानातील मूलभूत योगदान

*प्रस्तुत लेखात प्रो. सत्येंद्रनाथ बोस हे नेमके कोण होते याचा धावता आढावा घेतला आहे. त्यांची दखल खुद्द आइनस्टाईन यांनी घेतली होती ! - संपादक*

विसावे शतक उगवले ते पदार्थविज्ञानात विविध आव्हाने घेऊनच. अणूंची रचना, क्ष-किरणांवर अभ्यास, आइनस्टाईन यांचा विशिष्ट सापेक्षतावाद सिद्धांत इत्यादी.



याकाळात भारत ही ब्रिटिश वसाहत होती, कलकत्ता ही राजधानी होती. त्यात १९०५ साली, व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली आणि बांगला भाषिकांत मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. वाईटातून चांगले घडते, तसे यातून 'स्वदेशी' चळवळ वाढू लागली. प्रतिष्ठित व्यक्तींनी नवीन पिढीसाठी शाळा, महाविद्यालये स्थापन केली. सहाजिकच विद्यार्थ्यांवर देशभक्त शिक्षक आणि समर्पणाच्या भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा प्रभाव पडला.

सत्येंद्रनाथ बोस अशांपैकीच एक विद्यार्थी. यांचा जन्म १ जानेवारी १८९४ ला एका सुशिक्षित नोकरदार बंगाली कुटुंबात झाला. मुलगा हुशार होताच, त्याचे वडीलही गणिती कोड्यांची पुस्तके सोडवायला लावून प्रोत्साहन देत होते. एकदा शाळेमधील परीक्षेत तर त्याच्या शिक्षकांनी बुद्धिमत्तेवर खुश होऊन १०० पैकी ११० गुण दिले होते. सत्येंद्र मॅट्रिक विशेष गुणवत्तेने पास झाला व त्याने प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. इथेच त्याला त्याच्याच तोडीचे सहाध्यायी मिळाले. त्यापैकी एक म्हणजे, ढाक्याहून शिष्यवृत्ती मिळवून आलेला मेघनाद सहा. एकाहून एक सरस आध्यापकही तिथे शिकवत होते. यापैकीच एक होते डॉ. जगदीशचंद्र बोस!

सत्येंद्रनाथ बोस पदवी परीक्षेला पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले, तर मेघनाद सहा दुसऱ्या क्रमांकाने. दोघांचा विषय होता गणित. याचीच पुनरावृत्ती पदवीउत्तर परीक्षेतही झाली. सहा आणि बोस जोडगोळीने पुढे विज्ञान क्षेत्रात देदिप्यमान कामगिरी केली. बोस यांचे वैशिष्ट्य असे की, कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. 'शारीरक्रिया विज्ञान' यासारख्या विषयातही १०० पैकी १०० गुण मिळवले होते. एम. एस्सी. परीक्षेतील मिळालेले गुण तर एक उच्चांक आहे. अजूनपर्यंत कोणालाही हे शिखर गाठता आलेले नाही.

स्वदेशीच्या प्रेरणेने कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू सर आशुतोष मुखर्जी यांनी 'युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ सायन्स' हे महाविद्यालय सुरू केले. इथे सत्येंद्रनाथ बोस गणित विषयाचे लेक्चरर म्हणून रुजू झाले. एका वर्षानंतर सर अशुतोष मुखर्जी यांनी त्यांना पदार्थविज्ञान विभाग सुरू करण्याची जबाबदारी दिली. हे आव्हान यांच्या चौकस वृत्तीला चालना देणारे होते. पदार्थविज्ञान विषयातही त्यांनी गरूडझेप घेतली. आइनस्टाईन यांनी

आपला सापेक्षतावाद सिद्धांत त्यांच्या मातृभाषेत म्हणजे जर्मन भाषेत लिहिला होता, हे फारसे कोणाला माहितही नसेल. सहा आणि बोस या जोडीने सापेक्षतावादाचे इंग्रजीत भाषांतर केले. हे या सिद्धांताचे जगातील पहिले इंग्रजी भाषांतर होते. २५ वर्षीय दोन भारतीय गणितज्ञ जर्मन भाषेतल्या पदार्थविज्ञानातील नवीनतम संकल्पना समजून घेतात, त्या इंग्रजी भाषेत मांडतात, तेही स्वतंत्रपणे युरोपात न राहून. हे खरंच किती कौतुकास्पद!

सन १९२१ साली सत्येंद्रनाथ बोस यांना ढाका विद्यापीठात पदार्थशास्त्र विभागात 'रीडर' म्हणून काम करण्याची संधी मिळाली. बोस यांना शिकवताना सोयी-सुविधांच्या अडचणी होत्या. पण शिकवणे मनापासून करत होते. म्हणूनच विद्यार्थ्यांना 'मॅक्स प्लँक नियम' शिकवत असताना, शंकांना उत्तर देताना, बोस यांचेच समाधान होत नव्हते. मॅक्स प्लँक नियमाबद्दल थोडक्यात जाणून घेऊ.

आपले वाहन चालवत असताना बंद पडले आणि मेकॅनिकने ते दुरुस्त करूनही दिले. पण त्यातील दोष काय हे निश्चित समजले नाही तर वाहन चालवताना जशी बेचैनी राहील, तशीच बेचैनी मॅक्स प्लँक यांनापण वाटत होती. कारण त्यांच्या सूत्रात एक जोड होता. सूत्राचा अर्धा भाग हा प्रकाशऊर्जा ही तरंग आहे, असे मानून पारंपरिक भौतिकी नियमांचा आधार घेऊन साधला होता. तर दुसरा अर्धा भाग साधण्यासाठी एका नवीन संकल्पनेचा आधार घेतला होता. ही संकल्पना म्हणजे, क्वांटा. क्वांटा म्हणजे प्रकाश एक तरंग नसून तो कणांनी वाहणारा असेल.

हा जोड बोस यांना पटत नव्हता. बोस यांनी हे सूत्र स्वतःच्या पद्धतीने मांडायचे ठरवले. या सूत्रात प्रकाशकण (फोटॉन) हेच मूलकण असतील असे मानले आणि भौतिकशास्त्राचे पारंपरिक नियम इथे लावायचे नाहीत हे पहिले तत्त्व असेल, असे ठरवले. मॅक्स प्लँक याने क्वांटा म्हणून जी कल्पना केली होती त्याला फोटॉन नाव मिळून ती संकल्पना रूढ झाली होती. पण इतर सूत्रांत आधार म्हणून तिचा उपयोग केला नव्हता.

शालेय विज्ञानात इलेक्ट्रॉन, प्रोटॉन, न्यूट्रॉन आपण शिकलो आहोत. इलेक्ट्रॉन ठरावीक कक्षेत अणूकेंद्राभोवती फिरतात. त्यामुळे प्रत्येक इलेक्ट्रॉनला वेगळी ओळख देता येते. पण प्रत्येक फोटॉन हा वेगळा ओळखताच येणार नाही. हे दुसरे तत्त्व ठरवले. तिसरे तत्त्व ठरवले की, फोटॉन यांना दोन प्रकारचे फिरत (स्पिन) असतील. ही तिन्ही तत्त्वे बोस यांच्या स्वयंप्रतिभेचा नमुना आहेत. या तत्त्वांच्या आधारे यांनी मॅक्स प्लँक यांचा नियम बिना जोडकाम सहज-सोप्या पद्धतीने सिद्ध करून दाखवला.

आपल्या पद्धतीचा शोधनिबंध बोस यांनी लंडन येथील 'फिलॉसॉफिकल मॅगेझिन' कडे पाठवला जेणे करून युरोपियन विज्ञानविश्वाला ही पद्धत समजावी. पण हा शोधनिबंध नाकारला गेला. बोस यांनी धाडसी निर्णय घेऊन आपला शोधनिबंध थेट आइनस्टाईन यांनाच पाठवला. सोबत एक पत्र जोडले. सुरुवातीलाच स्वतःच्या पद्धतीची नवीन तत्त्वे आणि मांडणी काय आहे हे सांगितले आणि जर्मन भाषेत प्रसिद्ध करावा अशी विनंती केली. स्वतःची ओळख म्हणून ८ वर्षांपूर्वी केलेल्या सापेक्षतावादाच्या भाषांतराची आठवण करून दिली.

बोस यांच्या शोधनिबंधाचे आइनस्टाईन यांनी स्वतःच जर्मन भाषेत भाषांतर केले व ताबडतोब प्रसिद्धही केला. बोस यांचा शोध नवीन संशोधनासाठी वैज्ञानिकांना एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे, असे गौरवोद्गार त्यांनी प्रकाशनात तळटीप म्हणून जोडले. वैज्ञानिकांना पडलेले एक कोडे समाधानकारकपणे तर सोडवले गेले

होतेच शिवाय विज्ञानातील नवीन ‘बोस–आइनस्टाईन सांख्यिकी’ला सुरुवात झाली..

याच्या पाठोपाठ बोस यांनी दुसरा शोधनिबंध आइनस्टाईन यांच्याकडे पाठवून दिला. तोही त्यांनी भाषांतरीत करून प्रसिद्धही केला. जर फोटॉनच्या आधारे अभ्यास केला तर पदार्थांची एक नवीच अवस्था अस्तित्वात येऊ शकेल, हे बोस यांनी शोधनिबंधात दाखवून दिले. पदार्थाच्या स्थायू, द्रव, वायू या तीन अवस्था सर्वांना परिचित आहेत. प्लाझ्मा ही चौथी अवस्था. बोस यांच्या नवीन सिद्धांतानुसार वायू अतिशय थंड केल्यास त्याची सुपर–कंडक्टर (अतिवाहकता किंवा अतिद्रायुता) ही पाचवी अवस्था होते. हा शोध ‘बोस–आइनस्टाईन कंडेन्सेशन’ ओळखला जातो.

बोस आणि आइनस्टाईन यांनी एकमेकांच्या शोधांची भाषांतरे केली, हे विशेष!

फोटॉनसारखे गुणधर्म असणाऱ्या मूलकणांना बोस यांच्या सन्मानार्थ ‘बोसॉन’ हे नाव दिले आहे. जगात फक्त दोन प्रकारचे मूलकण आहेत, फर्मिऑन (इलेक्ट्रॉन, प्रोटॉन इ.) आणि बोसॉन.

दोन्ही सिद्धांत १९२४च्या उत्तरार्धात बोस यांच्या नावावर प्रसिद्ध झाले आणि उत्तरादाखल आइनस्टाईन यांचे एक साधे पोस्टकार्ड आले. आइनस्टाईन नावाचे वलय एवढे होते की, पोस्टकार्डाच्या मजकुरावरून ढाका विद्यापीठाने बोस यांना अभ्यासासाठी युरोपला जाण्यासाठी २ वर्षांची रजा दिली. १९२४–१९२५ या काळात बोस युरोपात फ्रान्स व जर्मनीमध्ये विविध वैज्ञानिकांना भेटले व संशोधनाची नवीन क्षेत्रे समजून घेतली. आइनस्टाईन यांची भेट झालीच; तसेच मादाम क्युरी यांच्या प्रयोगशाळेत काम करायला मिळाले.

ढाका येथे परतताच विद्यापीठातील प्रयोगशाळा सुसज्ज करणे यावर त्यांनी भर दिला. एक्स–रे क्रिस्टलोग्राफी हे नवीनच शिकलेले तंत्र विद्यार्थ्यांना शिकवायला सुरुवात केली. त्यासाठी लागणारी उपकरणे स्वतःच्या देखरेखीत विद्यापीठात बनवून घेतली. १९४५पर्यंत बोस ढाका विद्यापीठात अध्यापन करत होते.

१९४५साली त्यांची कलकत्ता सायन्स महाविद्यालयात प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली. विज्ञानाचा बांग्ला भाषेतून प्रसार व्हावा म्हणून बोस यांनी १९४८साली ‘वंगीय विज्ञान परिषद’ स्थापन केली. भारतचे ‘पदार्थविज्ञान विषयाचे राष्ट्रीय प्राध्यापक’ पद त्यांना देण्यात आले होते. उत्साही, प्रसिद्धी–पराङ्मुख, भाषा, साहित्य, संगीत ह्यातील रुची यामुळे सर्व क्षेत्रांत मित्रपरिवार होता. ‘इसराज’ हे वाद्य बोस लीलया वाजवत. बालपणी रुजलेल्या देशभक्तीमुळे ते भारत स्वतंत्र होईपर्यंत कधीही इंग्लंडला गेले नाहीत.

बोस यांचे ४ फेब्रुवारी १९७४ रोजी निधन झाले. त्यांचे आयुष्य शिक्षणक्षेत्राला व मूलभूत विज्ञानाच्या प्रगतीला समर्पित होते. १९८४ साली भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ SN Bose National Centre for Basic Sciences स्थापन केले.

बोस यांच्या पश्चात त्यांचे सिद्धांत सिद्ध झाले. १९९५साली अमेरिकेतील तीन शास्त्रज्ञांना कंडेन्सेशन अवस्था आणण्यात यश मिळाले. बोसॉन मूलकणांचे अस्तित्व जुलै २०१२मध्ये सिद्ध करता आले.

२०२५ हे ‘आंतरराष्ट्रीय क्वांटम विज्ञान व तंत्रज्ञान वर्ष’ म्हणून घोषित केले आहे. १०० वर्षांपूर्वी भारतातील सत्येंद्रनाथ बोस यांनी प्रकाशित केलेल्या फोटॉन कणामुळे क्वांटम विज्ञान आज मोठी वाटचाल करीत आहे.

**– विदयेश कुलकर्णी**

Email : vidyesh.kulkarniyahoo.co.in

# उंटांची अद्‌भूत रम्य दुनिया
# २०२४ हे आंतरराष्ट्रीय कॅमेलीड्‌सचे वर्ष

*प्रस्तुत लेखाच्या शीर्षकावरून 'उंट' या प्रजातीची माहिती वाचण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या मनात निर्माण नक्कीच झाली असेल! वाचा तर... - संपादक*

**Ear Tag Project - (Winter 1993)**

जर्मनीला परत आल्यावर तिला नवीन जॉब पाहून नवीन सुरवात करायची होती. पण समस्या अशी होती की ती कुठच्याही एका शिस्तबद्ध शाखेत बसू शकत नव्हती. तिचे संशोधन रेकॉर्ड म्हणजे मानववंशशास्त्र आणि प्राणी विज्ञान यांचे मिश्रण होते, त्यात पुरातत्त्व आणि पर्यावरणशास्त्र यांचा समावेश होता. यूएसएमध्ये ती केवळ पशुवैद्यकीय प्रमाणपत्रे असूनही मानववंशशास्त्र विभाग शिकवू शकली होती, परंतु जर्मनीमध्ये ती अयोग्य ठरते. तिला कुठल्यातरी शैक्षणिक शाखेत स्वत:ला परत नव्याने शोध घ्यायला हवा होता.

तिचे संशोधन हे उत्खनन व मानववंश शास्त्र असे एकत्रित होते. ती वेगवेगळ्या शैक्षणिक विभागांत सामावू शकत नव्हती. पशुवैद्यकीय औषधांमध्ये तिला फारशी संधी नसते. शेवटी तिला प्राणीशास्त्र विभागांत काम मिळते.

जर्मन प्रोफेसर तिला कल्चरल झुओलॉजीमध्ये प्रोत्साहन देतात. ते तिला यांत संशोधन करायला सांगतात व जर्मन डिग्री मिळवून विद्यापीठात शिकवायची संधी निर्माण करायला सांगतात. यासाठी ती प्रयत्न करते.

तर इकडे भारतातील प्रोफेसरांचे दुसऱ्या बाजूने प्रयत्न चालू होते. ते दोघे मिळून थर वाळवंटात पशुपालनाचे भविष्य यावर जोधपूरमध्ये कॉन्फरन्स बोलावतात. (Future of pastoralism in in the Thar Desert) ही मीटिंग लक्षात राहण्याजोगी झाली. कारण यांत फक्त शास्त्रज्ञच नाही; तर प्रगतीसाठी तज्ज्ञव्यक्ती व रायका व त्यांच्या बायकाही भाग घेतात. ते एकमेकांवर आरोप करतात व एकमेकांवर चप्पल फेकण्यापर्यंत मारामारी होते ! रायकांचे म्हणणे असते की, शास्त्रज्ञांचे संशोधन रायकांच्या समस्या व अडचणी सोडविण्यास मदत करत नाही.

इल्सला काही बाबतीत रायकाचे म्हणणे बरोबर वाटते. रायका त्यांना तोंड द्यावे लागणाऱ्या सर्व समस्यांवर ते एक निवेदन जारी करतात. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी व पशुपालनाची परिस्थिती सुधारण्यासाठी पशुपालक संघातर्फे खालील उपाय सुचवण्यात येतात.

१) चरण्याच्या समस्या -

- गोचर, ओरण व अगोरचे संरक्षण व सुधारणा व त्याकडे नेणाऱ्या रस्त्यांचेही संरक्षण.
- यांचा बेकायदेशीर ताबा थांबवणे.
- आरवलीच्या जंगलांत चरायची परवानगी.
- जंगलांतील बंदिस्त जागा दर पाच वर्षांनी उघडणे.
- पिकांची कापणी झाल्यावर उजाड जागी चरण्याची परवानगी.
- इतर शेजारच्या प्रांतात कमी पैसे आकारून परवानगी
- (prosopis juliflora) परदेशी बाभूळ ही वनस्पती काढून टाकणे.
- इंदिरा गांधी कालव्याजवळ चरण्याची सुविधा निर्माण करणे.

२) आर्थिक स्तर सुधारण्यासाठी -

इतर गोष्टींच्या किंमती वाढतील तेव्हा जनावरांपासून बनवलेल्या वस्तुंच्या किंमतीत वाढ. लोकरीच्या आयातीवर देशी लोकरीचे उत्पादन वाढविण्यासाठी लोकरीच्या आयातीवर कर लादणे.

३) पशुपालक अनेकवेळा लोकरीच्या बाजारात फसवले जातात, म्हणून को-ऑपरेटीव्ह सोसायट्यांची वाढ.

४) जनावरांच्या आरोग्याची काळजी.

५) पशुपालकांना स्वस्तांत व्हॅक्सीन व कृमीनाशक औषध मिळणे व इतर अनेक मुद्दे.

६) उंटांची लोकर मशीनने कापण्याच्या पद्धतीची ओळख करून देणे.

७) शैक्षणिक सुविधा, त्याच्या मुलांसाठी बोर्डींग स्कूल उघडणे व त्यांना शिष्यवृत्ती देणे.

८) साथीच्या रोगांच्या दरम्यान, नैसर्गिक आपत्ती व असामाजिक गोष्टींना सामोरे जाताना अपघाती मृत्यू झाल्यास पशुपालकांना मदत देणे.

RAIKA' संघटनेच्या आवश्यक बाबी पूर्ण करण्यासाठी त्यांनी आणखी एक मीटिंग बोलावली. अडोजीने वेगळी मीटिंग बोलावली. कोमल कोठारीच्या घरी ते भेटतात. अडोजी बरोबर एक तरुण मुलगा आलेला असतो. त्याचे नाव रुपाराम असते. तो. १०वी पर्यंत शिकलेला असतो. गेल्यावर्षी तिने, 'IPP league for pastoralpeople' म्हणून जर्मनीमध्ये पशुपालकांना टेक्निकल सल्ला देण्यासाठी सोसायटी स्थापन केली होती. ती रुपारामला त्या संस्थेचा स्थानिक सदस्य करून घेते. रुपाराम त्यांचा फिल्ड असिस्टंट होतो. त्याचे काम असते की, त्याने कोमल कोठारीला नियमित रिपोर्ट द्यायचा व इल्सला महिन्याचा रिपोर्ट मेल करायचा. त्याचे मुख्य काम होते की, त्याच्या वडिलांच्या उंटाच्या कळपाचा स्थलांतराचा रस्ता रेकॅार्ड करायचा व उंटांच्या व्यवस्थापनाची व इतर गोष्टींची नोंद घ्यायची.

१९९४ च्या सुरवातीला तिला जास्त वेळाची संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे तिला युनिव्हर्सिटी स्तरावरही शिकवता आले असते. तिला तिच्या कुटुंबालाही जोधपूरमध्ये आणायची परवानगी मिळते. ती फेब्रुवारीत जोधपूरला येते. हणमंत तिला घर शोधायला मदत करतो. ती आयेशा व जोन नवीन शाळेत कसे रुळतील याबद्दल थोडी शाषंक असते. गॅरीला (house husband) घरातच रहावे लागते. वसंत ऋतूच्या शेवटी रायकांच्या फायद्यासाठी तिला जर्मन चॅरिटीकडून रायकांसाठी योग्य प्रकल्प करण्यासाठी मदत मिळते. त्या प्रकल्पाचे नाव CHIP) ठेवतात. Camel Husbandary Improvement Project. हणमंतला प्रोजेक्ट मॅनेजर बनवले जाते. त्यांचे पहिले काम होते फिल्ड ऑफिसर शोधणे व जागा शोधणे. बहुतेक जागा बंद व जैन समाजातील लोकांच्या असतात. त्यांचे धंदे मुंबईत असतात. ते परदेशी व्यक्ती, मांसाहारी जेवण व दारू विषयी जास्त चिंतातुरग्रस्त असतात.

अनेक आठवडे शोधल्यावर एका छोट्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर लहान दोन खोल्या मिळतात. त्याचा मालक मुस्लीम शाळामास्तर असतो. छताची उंची खूप कमी असते त्यामुळे पंखा लावता येत नाही. तेथे बाथरूमही नसते व भाडेही खूप जास्त असते. पण त्यांना कमीतकमी त्यांचे सामान ठेवायला जागा मिळते. त्यांना कडक कायदे व नियमांचे पत्रक दिले जाते. जागेचा एक फायदा असतो की, ती साद्री व राजपूर जोडणाऱ्या रस्त्यावर असते.

अंजी-की-धानीच्या रायकांच्या मते हा 'टीका प्रकल्प' होता. त्यांच्या उंटांना फुकट इंजेक्शन्स मिळतील म्हणजे मादी उंटांचे गर्भपात होणार नाहीत व त्यांना पुष्कर मेळाव्यांत जास्त नर उंट विकता येतील.

हणमंत, इल्स व रुपाराम अँबेसिडरमधून अंजी-की-धानीला रुपारामच्या घरी जातात. अनेक वयस्क जमतात. हणमंत प्रोजेक्टचे महत्त्व व स्वरूप सर्वांना सांगतो की, मॅडमच्या उंटांच्या व रायकांच्या प्रेमापोटी तुम्हांला, त्यांना मदत करायची आहे की, ज्यामुळे उंटपालनाचा धंदा परत एकदा फायद्याचा होईल. पण यासाठी त्यांना मदतीची गरज आहे. दोघांमध्ये समझोता व्हायला हवा. ते सर्व पशु वैद्यकीय मदत देतील पण हे बघणेही महत्त्वाचे आहे की, औषधांवर एवढा पैसा खर्च करणे गरजेचे आहे का? की इतर काही उपायही आहेत. त्यांना काही उंटपालकांच्या पालकांची गरज आहे जे त्यांच्या उंटांना टीका देण्याच्या बदल्यात जन्म, गर्भपात व मृत्यू सगळ्या नोंदीसाठी मदत करतील व या नोंदी केलेल्या जनावरांना Ear tag (शिक्का किंवा बिल्ला) लावला जाईल. अनेक कळपांचे मालक या प्रोजेक्टसाठी तयार होतात.

काही दिवसानंतर रुपाराम तिला भेटायला येतो. तो तिला सांगतो की, बहुतेक सर्वांनी आपले मत बदलले आहे. त्यांना ear tag project पसंत नाही. त्यांना असे वाटते की, बाईजीला सर्व उंटांचा ताबा हवा आहे व तिला त्यांना जर्मनीला न्यायचे आहे. रुपारामच्या वडिलांचा तिच्यावर विश्वास असतो. पण त्याचे म्हणणे असते की, ईअर टॅग नंतर लगेचच टीका मिळाला पाहिजे कारण लवकरच पाऊस चालू होईल त्यापूर्वी टीका मिळणे गरजेचे आहे.

डॉक्टरच्या पोस्टसाठी अनेक अर्ज येतात. पण एकचजण मुलाखतीसाठी येतो. दुसऱ्याच दिवशी त्याला सरकारी जॉब मिळतो. दुसरा एक चांभार म्हणून त्याला जॉब नाकारला जातो. पण त्यालाही लगेच सरकारी नोकरी मिळते.

रुपाराम सगळ्या नोंदी करतो, जन्म-मृत्यू, नाव, गरोदर, गर्भपात इ.इ. तो टेस्ट कळपाच्या स्थलांतराचाही रेकॉर्ड ठेवतो. हणमंतही इंजेक्शन द्यायला शिकतो. एल्सही तिचे पशुवैद्यकीय ज्ञान आठवते.

काही दिवसांनी रुपाराम त्यांना भेटायला येतो. अंजी-की-धानी मधील काही समर्पक घडामोडी ऐकायला ती उत्सुक असते. हळूहळू सर्व लोकांचे मत बदलल्याचे तो सांगतो. ते यांच्यावर विश्वास ठेवू शकत नव्हते. 'इयर टॅग' म्हणजे रायकांना त्यांच्या प्राण्यावरील मालकी हक्क सोडावा लागेल. त्यांचे सर्व उंट जर्मनीला नेण्यासाठी बाईजी हे सर्व करत असल्याची भीती. त्यांनी व्यक्त केली पण त्यांच्या वडिलांचा त्यांच्यावर विश्वास होता. आता अवास्तव मागण्यांही सुरू झाल्या होत्या. अडोजीची मागणी होती की, मॅडमने जंगलात चरण्याची फीही द्यावी, ती फक्त काही हजार रुपये आहे. जोधपूरहून प्रोफेसरांचा फोन आला की सरकारकडून तक्रार येते की कोणी रायका सांगतो की, त्यांना जर्मन सरकारकडून चरायला परवानगी आहे. तिच्या लक्षांत येते की, हे काम अडोजीचे आहे. (गुन्हेगार)

फक्त एकाच गटावर अवलंबून राहाण्याऐवजी ते गोदवार ग्रुपवरही काम करायचे ठरवतात. लटाडा गावांतील सांतीबा ज्याला ती सर्व प्रथम १९९१ मध्ये भेटलेली असते, तो त्याचा भाऊ, पुतण्या व दोन आणखी कुटुंबं त्यांच्या उंटाना टॅग लावून घ्यायला तयार होतात. पण त्यांचा हा आनंद फार वेळ टिकत नाही. लटाडा मधील एक रायका रागारागाने हणमंतला अद्वातद्वा बोलतो व सगळे टॅगस् त्याच्यावर फेकतो. त्याच्या म्हणण्या प्रमाणे अंजी-की-धानी गावांतील प्रत्येक रायकाला टॅगच्या बदल्यांत ४०००रु. मिळाले आहेत. हणमंत खूप निराश होतो. तरीही सांतीबा व आणखी एक दोघेजण तिच्या बरोबरच राहतात. नंतर, 'सेवारी' गावातील रायका टॅगसाठी तयार होतात व नंतर अनेक रायका चौकशी करतात. त्यांना त्या जादूई औषधाविषयी अतिशय आकर्षण असते व आमिष असते.

जगातील एक अंतिम सत्य हे की, कोणीच कोणाचं नसतं!

पुढच्या काही महिन्यांत एकूण ३०० उंटाना औषध दिले जाते व टॅग लावला जातो. काही दिवसांनी त्यांना टॅगस्‌ निरर्थक वाटू लागतात. कारण त्यांच्या लक्षात येते की, उंटांचे वर्गीकरण करण्याची रायकांची एक पद्धत आहे. मातृवंशाप्रमाणे त्यांचे वर्गीकरण होते. एखाद्या कळपांत सारखे नाव असलेले तीन-चार उंट असत. आई, आजी, मुलगी सर्वांना तेच नाव असे.

रायकांची अर्थव्यवस्था, उंट व इतर जनावरांवर अवलंबून होती. पण त्यांचे सामाजिक जीवन हे लग्न व्यवस्थेवर अवलंबून असते. त्यांच्याकडे बाल विवाहाची पद्धत होती. मुलगी वयांत येईपर्यंत माहेरीच राहत असे. नंतर ती सासरी येत असे. काहीवेळा तिला सासर पसंत नसेल तर ती नांदायला जात नसे व समस्या निर्माण होत असे.

मीरा बाळंतीण होते ती एका निरोगी, बछड्याला जन्म देते. ते खूप खेळकर असते. मॅडमला खूप आनंद होतो. पण हा आनंद फार दिवस टिकत नाही. तिला मॅसेज येतो की, तो बछडा महेन्द्रगढ मरण पावला. कारण समजत नाही. ते या वर्षीच्या पुष्कर मेळ्याला निघतात. उंटांना डीवर्मचे औषध देतात व व्हिटमिन्स देतात. रुपाराम टेस्टच्या कळपांबरोबर राहतो व महत्त्वाच्या व इतरही गोष्टींची जाणीवपूर्वक नोंद ठेवतो. या नोंदीमुळे खूप गोष्टी समजतात. आत्तापर्यंत गोदवारच्या रायकांनी पुष्कर फेअरमध्ये कधीच भाग घेतलेला नसतो. इल्स व हणमंत मोटरबाईकवर पुष्कर फेअरला जातात. खूप थंडी असल्याने प्रत्येक स्टॅन्डवर चहासाठी थांबतात.

पुष्कर जत्रा म्हणजे बाहेरच्या लोकांना पूर्ण गोंधळ दिसतो. पण तिच्यामते व्यवस्थापन व पुरवठा याचे सुंदर उदाहरण आहे. (logistics) हजारोंनी आलेल्या जनावरांना अन्न व पाणी देणे हीच खूप मोठी कामगिरी असते. प्रत्येक उंट पालकांसाठी वेगळा डेरा-तंबू असतो. जिथे ते बांधले जातात तेथे सर्व सामान ठेवले जाते व शेकोटीही असते. अंजी-की-धानी, मेवाडचे रायका, सोजतचे व जयरमेलचे मुस्लीम यामुळे खरेदी करणाऱ्यांना लगेचच समजत असे.

रायका सोसायटी आडोजीसाठी एक नर उंट विकत घेते. पण घासाघीस करूनही तो खूप महाग, चौदा हजाराला मिळतो. तो चांगल्या जातीचा, गडद तपकिरी रंगांचा असतो. हणमंतही तिच्यासारखाच साशंक होता. पण तो उंट खूप छान होता, कोणताही डाग नसलेला, केसांची छान रचना असलेला, चांगला वागणारा. त्याच्या मालकाला त्याच्यापासून फारकत घेतल्याचे दु:ख झाले. १४,०००/- रुपये त्यांच्या कल्पनेपेक्षा अधिक होते, परंतु त्यांना देखील मागे जायचे नव्हते. तो संचोरेचा राजस्थानच्या जलोर जिल्ह्यांतील असतो. गोधवारच्या रायकांना चांगला बुल उंट हवा असतो की, ज्यामुळे चांगले नवीन नर निपजतील व त्यांना पुष्करच्या जत्रेत विकून फायदा होईल.

त्याचे नाव मोती ठेवतात. मोती त्यांना कधी पश्चात्ताप करायला लावत नाही. लांबलांबून लोक त्याच्या माद्यांना घेऊन येतात. अडोजीचा उंटांचा कळप दुप्पट होतो व पुष्करच्या जत्रेतही त्याचे नर उंट चांगल्या किंमतीला विकले जातात. पण दुर्दैवाने मोती दोन वर्षांतच मरण पावतो. त्याला इलेक्ट्रीक वायरचा शॉक बसतो. पण त्याची परंपरा चालू राहते. त्याचे आनुवंशीक योगदान मोठे असते. आजही इतक्या वर्षांनी लोक मोती व त्याच्या संततीच्या गुणांची आठवण काढतात.

**- सौ. अल्पना बापट**
डॉ. बापट हॉस्पीटल, ठाणे
भ्रमणध्वनी - ९८३३०२९३५६

●●●

गोड बोलणारे आयुष्य कडू करून जातात!

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

दि. ८ फेब्रुवारी रोजी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची व शिक्षकांची नेत्र तपासणी झाली.



दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता माननीय प्रधानमंत्री महोदयांचा 'परीक्षा पे चर्चा' हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम इ.६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी खोली क्र.२१ मध्ये, तर ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी संगणक खोलीत प्रक्षेपित करण्यात आला.



केंद्र शासनाच्या 'माझा भारत पदयात्रा' अंतर्गत दि. १९ फेब्रुवारी रोजी 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने इ.८वी व ९ वी चे एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचे नेतृत्व सौ. बोरवणकर, श्री. शिरापुरी, श्री. देवघरे या शिक्षकांनी केले.



दि.२७ फेब्रुवारी रोजी दोन्ही विभागांतून 'मराठी राजभाषा दिन' निमित्त 'मराठी दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने कुसुमाग्रज यांची माहिती, मराठी कविता वाचन, पोवाडा गायन घेण्यात आले.



दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिन निमित्त विज्ञान संकल्पनांवर आधारित 'विज्ञान खेळणी बनवणे' ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमासाठी इ. ६वी व ८वी च्या ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यामधून प्रत्येकी २-२ विद्यार्थ्यांचे क्रमांक काढून प्रमाणपत्र देण्यात आले.



पुणे येथे झालेल्या ‘morde’ फाउंडेशन तर्फे आयोजित बुद्धिबळ स्पर्धेमध्ये अथर्व कदम या विद्यार्थ्यास तीन हजार रुपये रोख रकमेसह तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.




शाळेतील सर्व शिक्षकांचे ‘शिक्षक क्षमता वृद्धीकरण’ प्रशिक्षण दि. ११ फेब्रुवारी ते १ मार्च या दरम्यान तीन टप्प्यांत आयोजित करण्यात आले.



## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

### ज्ञानद्वीपावर ‘स्वत्त्व’ सोहळा संपन्न

प्रत्येक मनुष्य हा लाखो पेशींनी बनलेला असतो. प्रत्येक पेशीच्या गाभ्यात त्या व्यक्तीचा जनुकसंचय डीएनए क्रमांच्या स्वरूपात, तेवीस गुणसूत्रांच्या जोड्यांमध्ये साठवलेला असतो. ऍडीनिन, थायमिन, ग्वानिन आणि सायटोसिन यांच्या अद्वितीय क्रमाने बनलेल्या DNA चा हा जनुकसंचय म्हणजे प्रत्येक मानवाची खास ओळखच म्हणायला हवी. 'DNA sequencing' नावाच्या तंत्राने DNA मधील ऍडीनिन, थायमिन, ग्वानिन आणि सायटोसिन यांचा हा अनोखा क्रम जाणून घेता येतो. आजकाल यासाठी लागणारा कालावधी आणि खर्च पूर्वीपेक्षा बराच कमी झाला आहे. गमतीची बाब म्हणजे मानव आणि मानव जातीसदृश चिंपँझीमधील डीएनएमध्ये केवळ १% फरक आढळून आला आहे. तसेच, दोन मानवांच्या डीएनएमध्ये फक्त ०.१% फरक आढळून येतो. हाच फरक त्या व्यक्तींना त्यांचे गुणधर्म देतो.

पाश्चिमात्य देशांनी १९९० साली मानवाची संपूर्ण जनुकीय माहिती मिळविण्यासाठी ‘ह्युमन जीनोम प्रकल्प’ राबवला गेला. २००३ साली त्याचे निष्कर्ष प्रकाशित करण्यात आले. ९२% मानवी जनुकक्रम यावेळी अभ्यासला गेला. प्रथिनरूपात व्यक्त होणाऱ्या, तसेच प्रथिनरूपात व्यक्त न होणाऱ्या सर्व डीएनए क्रमांचा उलगडा केला गेला. त्यावेळी उपलब्ध असलेली साधने मर्यादित असल्यामुळे उरलेला ८% जनुकक्रम २०२२ साली प्रकाशित झाला. या आंतरराष्ट्रीय प्रकल्पामध्ये पाश्चिमात्य मानवांची जनुके अभ्यासली गेली. विविध मानवी आजारांवर जनुकीय उपाय शोधून काढणे, जनुकीय आजारांची कारणे शोधणे व मानवी समुदायातील विविधतेच्या कारणांचा अभ्यास करणे इत्यादी उद्दिष्टे या प्रकल्पात अंतर्भूत होती. हा अभ्यास करताना मानवी जीनोममध्ये २५० हून अधिक कर्करोगाची जनुके अधोरेखित केली गेली. त्यांच्या अभ्यासाने काही प्रकारच्या कर्करोगावर मात करणे किंवा कर्करोग होणार असल्यास त्याची पूर्वसूचना व्यक्तीस देता देणे आता शक्य झाले आहे.

याच धर्तीवर भारत सरकारच्या जैवतंत्रज्ञान विभागाने २०२० साली ‘जिनोमइंडिया प्रोजेक्ट’ या अत्यंत महत्त्वाकांक्षी संशोधन प्रकल्पाचा आरंभ केला. फेब्रुवारी २०२४ मध्ये ९९ वांशिक गटांमधून १०,०७४

व्यक्तींचा जनुकक्रम निर्धारित करण्यात आला. पाच वर्षांतच दहा हजार भारतीय नागरिकांचा जनुक आराखडा उलगडून या प्रकल्पाने यशाचा अतिशय महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. ९ जानेवारी २०२५ रोजी माननीय पंतप्रधानांनी याची अधिकृत घोषणा केली. सर्व भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून यावा अशीच ही घटना आहे. या यशामध्ये अनेक संशोधक आणि संशोधन संस्थांचा उल्लेखनीय वाटा आहे. या प्रकल्पासाठी एकोणीस हजारांपेक्षा जास्त रक्ताचे नमुने संकलित करून 'जिनोम इंडिया बायोबँके'मध्ये संग्रहित करण्यात आले. या प्रकल्पामध्ये मिळालेली सर्व माहिती 'इंडियन बायोलॉजिकल डेटा सेंटर'मध्ये (आयबीडीसी) साठवून ठेवली आहे.

भौतिक, पायाभूत सोयी-सुविधांवर केलेला शासकीय तिजोरीतला खर्च सामान्य जनतेस ठळकपणे दिसून येतो. परंतु संशोधनामध्ये केलेली आर्थिक गुंतवणूक फलद्रूप होण्यासाठी मात्र बराच काळ जावा लागतो. 'जिनोम इंडिया' प्रकल्प असाच एक अत्यंत महत्त्वाचा संशोधन प्रकल्प म्हणता येईल. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने वित्तपुरवठा केलेल्या या प्रकल्पात संशोधकांना साडे-तेरा कोटींपेक्षा जास्त जनुकीय फरक आढळले आहेत. भारतीय लोकसंख्येचे वैशिष्ट्य असणारी अद्वितीय विविधता आणि तिचे प्रतिनिधित्व करणारी 'जनुकीय भिन्नता' यांचा उलगडा या प्रकल्पाने होऊ शकतो. भारतात विशिष्ट जातीजमातींत प्रामुख्याने आढळणाऱ्या आनुवंशिक तसेच संसर्गजन्य आजारांवरील उपचार अधिक प्रगत करण्यात यामुळे मदत होऊ शकते. या प्रकल्पामुळे जनुकीय विकारांवरील संशोधनात क्रांती घडून येईल, भारतीय स्वरूपाच्या समस्यांवर भारतीय उपाय उपलब्ध होतील, अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पातील शास्त्रीय निरीक्षणे ही वैद्यकशास्त्र, रोगनिदान शास्त्र, जनुकशास्त्र या क्षेत्रांमध्ये क्रांतिकारक बदल घडवून आणणार आहेत.

या विजिगिषु प्रकल्पाबद्दल सर्वसामान्यांना माहिती मिळावी या हेतूने, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून, बा. ना. बांदोडकर स्वायत्त महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आणि अभियांत्रिकी महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने एक आगळावेगळा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. भारतीय जनुकांचा शोध घेणाऱ्या, भारतीयांची स्वतःची ओळखच जणू दर्शवणाऱ्या या प्रकल्पाचा उत्सव 'स्वत्त्व-जिनोम इंडिया प्रकल्पाचा गौरव सोहळा' या सार्थ शीर्षकांतर्गत २५, २७ व २८ फेब्रुवारी २०२५ रोजी ठाणे महाविद्यालय परिसरात साजरा करण्यात आला.

वि. प्र. मं. चे विश्वस्त डॉ. महेश बेडेकर यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा उदघाटन सोहळा २५ फेब्रुवारी २०२५ रोजी ठाणे महाविद्यालय परिसरात संपन्न झाला. डॉ. बेडेकरांनी उद्घाटनपर भाषणात 'जिनोम इंडिया' प्रकल्पाचा भारतीय आरोग्यव्यवस्थेवरील नजीकच्या भविष्यकाळातील प्रभाव उदाहरणासहित स्पष्ट केला. बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांनीदेखील या प्रकल्पाचे जनसामान्यांसाठीचे महत्त्व विशद केले. या सोहळ्यात जिनोम इंडियाचे समन्वयक, सेन्टर फॉर सेल्युलर अँड मॉलेक्युलर बायॉलॉजी येथील शास्त्रज्ञ प्रोफेसर थंगराज, यांचे भारतीय जीनोम प्रकल्पाच्या अनुषंगाने 'लोकसंख्येचे जनुक-कोशशास्त्र आणि सार्वजनिक आरोग्य' या विषयावर ऑनलाइन माध्यमाद्वारे बीजभाषण झाले. भारतीय जीनोम प्रकल्पाचे महत्त्व त्यांनी विस्तृतपणे उलगडून सांगितले. भारतीय वंशाच्या उत्पत्तीचा शोध, तसेच जनुकीय आजारांचे जन्मपूर्व निदान यांमध्ये जिनोम इंडिया प्रकल्पामुळे काय क्रांती घडून येऊ शकते हे त्यांनी सविस्तर स्पष्ट केले.

त्यानंतर 'जिनोम इंडिया' प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष सहभाग असलेले, इन्स्टिट्यूट ऑफ लाईफ सायन्सेस, भुवनेश्वर, ओरिसा येथील शास्त्रज्ञ डॉ. पुनीत प्रसाद

यांचेही ऑनलाइन माध्यमाद्वारे 'A Paradigm Shift in Indian Genomics: India's Genome Project' या विषयावर भाषण झाले. जनुक अभिव्यक्ती या मूलभूत संकल्पनेपासून सुरुवात करून 'एपीजीनोम' चा प्रभाव, कृत्रिम बुद्धीमत्तेची या प्रकल्पातील भूमिका अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर त्यांनी प्रकाश टाकला.

उद्‌घाटनानंतर डॉ. महेश बेडेकर यांनी जिनोम इंडिया प्रकल्पाची माहिती देणाऱ्या प्रदर्शनाला भेट दिली. डीएनए, जनुके, जनुकीय आजार, त्यांचे परिणाम, त्यांचे सहज निदान, त्यासाठी करता येणारे प्रतिबंधात्मक उपाय हे सर्व विषय भित्तीपत्रके, प्रतिकृती, पथनाट्य, विज्ञानखेळ अशा विविध रंजक स्वरूपांमध्ये समजावण्यात आले. जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विद्यार्थी आणि वि.प्र.म.च्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मिळून सुंदर व अर्थपूर्ण प्रतिकृती साकारल्या होत्या. सापशिडी, फुल्लीगोळा अशा गंमतीशीर खेळांमधून जनुकीय आजार, त्याचे पूर्वनिदान यांचे महत्त्व समजण्यास मदत होत होती. 'ह्युमन जीनोम प्रकल्प', 'जिनोम इंडिया प्रकल्प', त्याचाशी निगडित 'संस्था आणि शास्त्रज्ञ', राबवण्यात येणारी 'प्रणाली', या प्रकल्पाचे 'फायदे, तोटे' हे सर्व दर्शवणारी भित्तीपत्रके आणि अतिशय उत्साहाने ही महत्त्वाची माहिती देणारे जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विद्यार्थी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. जनुकशास्त्र व जीनोम प्रकल्प या विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले होते. केंद्र सरकारने बाबत प्रसारित केलेली चित्रफीत दाखवण्यात येत होती. पाहुण्यांना या प्रकल्पाची आठवण म्हणून खास बुकमार्क दिले जात होते. एकूणच सर्व वातावरण भारावून टाकणारे होते.




बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नायक, तसेच जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या समन्वयक डॉ. कल्पिता मुळये व डॉ. जयश्री पवार, प्राध्यापिका पूर्वी शाह, प्रा. सायली दफ्तरदार, डॉ. अश्विनी टिळक, प्रा. वैशाली जोशी, प्रा. सुहासिनी शुक्ल यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. सर्वसामान्य नागरिक, तसेच विविध शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम २७ व २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत खुला होता. सर्व नागरिकांसाठी खुल्या असलेल्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमास विविध शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि ठाणेकर नागरिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला.

२८ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २ वाजता बांदोडकर महाविद्यालयातील पतंजली सभागृहात कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यामध्ये जिनोम इंडिया प्रकल्पाचे हेतू आणि यश याची चित्रफीत सादर करण्यात आली. गेल्या ३ दिवसांचा आढावा घेणाऱ्या ध्वनिचित्रफितीद्वारे पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी जैवतंत्रज्ञान विभागाच्या समन्वयक डॉ. जयश्री पवार यांनी स्वत्त्व कार्यक्रमाची रूपरेषा व त्यामागील विचार मान्यवरांना उलगडून सांगितले. भारतातील 'बायोजीनोमिक्स' या आघाडीच्या बायोफार्मास्युटिकल कंपनीच्या संचालिका डॉ. अर्चना कृष्णन यांनी समारोपाचे भाषण केले. अवयव प्रत्यारोपण ते इन्सुलिन सारख्या औषधांचे उत्पादन यांत प्रकल्पामुळे आमूलाग्र क्रांती कशी घडून येऊ शकते हे त्यांनी सोदाहरण दाखवू दिले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या समन्वयक डॉ. कल्पिता मुळये यांनी आभारप्रदर्शन केले. उद्‌घाटन व समारोपाचे कार्यक्रम https://youtube.com/live/863upkDJ7a4?feature=share या युट्युब वाहिनीवर देखील प्रक्षेपित करण्यात आले होते.

### अभ्यास सहल

संख्याशास्त्र व गणित विभागाचे विद्यार्थी ६ ते ८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत गोवा येथील कृषी महाविद्यालय आणि बिट्स पिलानी येथे अभ्यास सहलीला जाऊन आले. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शेतीमधील यादृच्छिक ब्लॉक डिझाइनचा वापर समजून घेण्यास, तसेच पदवीनंतर नोकरीच्या विविध संधींबद्दल माहिती मिळाली.




संख्याशास्त्र विभागाचे विद्यार्थी १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथे अभ्यास सहलीला जाऊन आले. या सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आर सॉफ्टवेअरमधील ऑपरेशन्सबद्दल माहिती मिळाली.

### शैक्षणिक भेट : वीर माता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान भेट भायखळा

महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग तर्फे १ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांची वनस्पती उद्यान भेट आयोजित करण्यात आली होती. या शैक्षणिक सहलीला एकूण ३५ विद्यार्थी उपस्थित होते. या शैक्षणिक भेटीकरिता बांदोडकर महाविद्यालयाचे सह-प्राध्यापक डॉ. अग्नीहोत्री, डॉ. जगताप आणि श्री. ओझरे उपस्थित होते.

### औद्योगिक सहल

रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी मॅप्रो फूड पार्क, मधुसागर आणि प्युअर्स बेरी, महाबळेश्वर येथे ५ ते ८ फेब्रुवारी २०२५ दरम्यान येथे भेट दिली. वास्तविक जगातील उद्योग कामकाज समजून घेणे, व्यावसायिक कार्य संस्कृती आणि करिअरच्या संधींबद्दल माहिती जाणून घेणे, सॉफ्ट स्किल्स विकसित करणे विद्यार्थ्यांना सैद्धांतिक शिक्षणासह व्यावहारिक कार्य वातावरणाबद्दल माहिती मिळवण्याच्या दृष्टीने या औद्योगिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ४२ विद्यार्थी व ३ शिक्षकांनी या सहलीत सहभाग घेतला.




### फिजिक्स कार्निव्हल

२७ फेब्रुवारी २०२५ - भौतिकशास्त्र विभाग येथे आयोजित फिजिक्स कार्निव्हल विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक अनुभव ठरला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते डॉ. एन. एम. अशोक, माजी वरिष्ठ प्राध्यापक आणि फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, अहमदाबाद यांचे 'Glimpses of the Amazing Universe' या विषयावरचे व्याख्यान, तसेच विविध विज्ञान-संबंधित उपक्रम जसे की प्रात्यक्षिके (डेमोन्स्ट्रेशन), पोस्टर सादरीकरण आणि विज्ञान प्रश्नमंजुषा (साइन्स क्विझ).

कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख डॉ. संगीता मेश्राम यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. यानंतर डॉ. अशोक यांनी आपल्या व्याख्यानात ब्रह्मांडाची उत्पत्ती, कृष्णविवर (ब्लॅक होल्स), न्यूट्रॉन तारे, एक्झोप्लॅनेट्स, आणि अंतराळ संशोधनातील भारताच्या भूमिका यावर माहितीपूर्ण व प्रेरणादायी चर्चा केली. त्यांच्या अभ्यासपूर्ण

विवेचनाने विद्यार्थ्यांना खगोलशास्त्र आणि अंतराळ संशोधनाची ओळख करून दिली. याशिवाय, विज्ञानविषयक प्रात्यक्षिके आणि पोस्टर सादरीकरण आयोजित करण्यात आले, जिथे विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या वैज्ञानिक संकल्पना आणि प्रयोग सादर केले. विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा देखील मोठ्या उत्साहात पार पडली, जिथे विद्यार्थ्यांनी आपल्या विज्ञानविषयक ज्ञानाची चुणूक दाखवली. या सर्व उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना प्रयोगात्मक शिकण्याची संधी मिळाली.

डॉ. यशोधन गोखले यांनी टेस्ला आणि लिथियम-आयन बॅटरीजवरील त्यांच्या चर्चेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी जलद चार्जिंग आणि दीर्घ आयुष्यमान यासारख्या वैशिष्ट्यांसह विविध प्रकारच्या बॅटरीची ओळख करून दिली. प्रभावी थर्मल व्यवस्थापनासाठी सुरक्षा आवश्यकता आणि बॅटरी व्यवस्थापन प्रणाली आणि वाहन नियंत्रण युनिट्समधील संवादाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. सिद्धिविनायक बर्वे यांनी इंडस्ट्री ४.० च्या अंमलबजावणीवर सादरीकरण केले, ज्यामध्ये तंत्रज्ञान, लोक, प्रक्रिया, उत्पादने आणि सेवा यांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी या नवीन औद्योगिक युगात डिजिटायझेशन आणि परस्पर जोडलेली मशीन्स कशी महत्त्वाची भूमिका बजावतात हे स्पष्ट केले. स्मार्ट मटेरियलसह कृत्रिम बुद्धिमत्ता, बिग डेटा आणि रोबोटिक तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण रिअल-टाइम प्रक्रिया करण्यास कसे सक्षम करेल आणि उत्पादन क्षमता कशी वाढवेल हे नमूद करताना सहयोगी रोबोट्स किंवा कोबोट्स या प्रगतीमध्ये कशी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

डॉ. अनामिका कदम यांनी ऑटोमॅटिक स्मार्ट डोअरबेल, पायझोइलेक्ट्रिक स्पीड ब्रेकर आणि सोलर-पाझो कोलिजन डिटेक्टर यासारख्या नाविन्यपूर्ण संकल्पना सादर केल्या. इंडस्ट्री ५.० ग्राहक अनुभव, खर्च नियोजन, पर्यावरणीय संबंध यावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता त्यांनी नमूद केली. त्याचबरोबर सेन्सर तंत्रज्ञान आणि नॅनोमटेरियल या संबंधी विशेष संशोधन करण्यावर भर दिला.

डॉ. शोभा शुक्ला यांनी नॅनोफोटोनिक्सचे तत्त्व, महत्त्व आणि उपयोग या संबंधी माहिती दिली. नॅनोमीटर स्केलवर प्रकाशाच्या वर्तनावर चर्चा केली. त्यांनी निसर्ग-प्रेरित इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर तंत्रज्ञानातील मर्यादांवर मात करण्यासाठी वितरित प्रक्रियेची आवश्यकता यावर चर्चा केली. त्यांच्या संवादात्मक सादरीकरणात कमी वीज वापर आणि सुधारित स्वीचिंग कामगिरीचे फायदे अधोरेखित केले.

डॉ. वाय. एस. राव यांनी 'शोध आणि नवोन्मेष' यातील फरकावर चर्चा केली. भारतात तंत्रज्ञानाच्या विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी उत्पादन विकासात सुरक्षिततेची आवश्यकता अधोरेखित केली आणि उपस्थितांना त्यांचे कौशल्य सतत वाढवीत राहण्यासाठी प्रोत्साहित केले. आयटी, ऑपरेशनल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या एकत्रीकरणाद्वारे मटेरियल ऑपरेशन्समध्ये वाढ कशी करता येते हे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. भरत गुप्ता यांनी लिथियम-आयन बॅटरीच्या नावीन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित केले, त्यांच्या उच्च ऊर्जा घनतेच्या सामग्री आणि त्यांना तोंड देणाऱ्या थर्मल रनअवे आणि पर्यावरणीय प्रभाव या आव्हानांवर चर्चा केली. बॅटरी तंत्रज्ञानामध्ये दुरुस्ती, नूतनीकरण, पुनर्वापर आणि पुनर्वापर या चार प्रक्रियांचे महत्व सांगितले.

डॉ. निनाद मेहेंदळे यांनी थ्रीडी प्रिंटिंग हे ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंगचा एक प्रकार आहे यावर सविस्तरपणे चर्चा केली, ज्यामध्ये थ्रीडी-प्रिंटेड चॉकलेटसह आकर्षक उदाहरणे सादर केली. त्यांनी थ्रीडी प्रिंटरचे विविध प्रकार आणि त्यांचे अनुप्रयोग स्पष्ट केले.

निरोगी मुले ही राष्ट्राची खरी संपत्ती आहे.

या परिषदेची पूर्वतयारी म्हणून व्ही.पी.एम. कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग आणि व्ही.पी.एम पॉलिटेक्निक ठाणे या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर आणि पेपर सादरीकरणाची स्पर्धा आयोजकांनी घेतली होती. यांचे नियोजन लायब्ररी इन चार्ज डॉ. गीता इंगवले आणि ट्रेनिंग अंड प्लेसमेंट इन चार्ज श्री. मोहिते पाटील यांच्या संघाने केले होते. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण या परिषदे दरम्यान करण्यात आले. या स्पर्धेची बक्षिसे व्ही.पी.एम पॉलिटेक्निक च्या माजी विद्यार्थी संघ 'स्नेहबंध' यांनी प्रायोजित केली होती. बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी या विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आणि उद्योगपती श्री. राजेश सोलंकी आणि प्राचार्य डॉ. डी. के. नायक उपस्थित होते.

पेपर सादरीकरणसाठी इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागातील कु. तनिष्का घाडगे आणि कु. पूर्वा शहाणकर यांना प्रथम पारितोषिक देण्यात आले. दुसरे पारितोषिक संगणक अभियांत्रिकी विभागातील कु. सिद्धी मालवणकर, कु. अंतरा परब आणि कु. काव्या वाडेकर यांना देण्यात आले, तर तिसरे पारितोषिक औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स विभागातील श्री. दक्ष मल्होत्रा आणि श्री. अर्णव दाभेकर यांना देण्यात आले. उत्तेजनार्थ पारितोषिक श्री. भावेश अडेपवार, कु. अदिती पावसकर आणि कु. शर्वरी सावंत यांना देण्यात आले.

पोस्टर सादरी करणात, संगणक अभियांत्रिकी विभागातील सुश्री सिद्धी मालवणकर यांनी प्रथम पारितोषिक जिंकले. दुसरे पारितोषिक संगणक विज्ञान विभागातील सुश्री समृद्धी पाटील आणि सुश्री ध्रुवी ओहळ यांना देण्यात आले. तिसरे पारितोषिक संगणक अभियांत्रिकी आणि औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स विभागातील दोन गटांमध्ये विभागण्यात आले. पात्र सहभागींना उत्तेजनार्थ बक्षिसे देखील देण्यात आली.

कार्यकमाचे सूत्रसंचालन इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाच्या प्रमुख वैशाली जोशी यांनी केले, तर कार्यक्रमाचा गोषवारा संगणक अभियांत्रिकी विभागाच्या प्रमुख सुहासिनी शुक्ला यांनी मांडला. कार्यक्रमाची सांगता करताना राष्ट्रीय परिषद सचिव डॉ. कीर्ती आगाशे यांनी सर्वांचे आभार मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.



पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी यांचे बीजभाषण, अनेक नामवंत वक्त्यांची माहितीपूर्ण आणि नावीन्यपूर्ण सादारीकरणाने आयोजन केलेली भाषणे, विद्या प्रसारक मंडळातील पदाधिकारी आणि विविध संस्था प्राचार्य यांची आणि पूर्ण सभागृहातील तरुण विद्यार्थी श्रोत्यांची प्रचंड उपस्थिती, सभागृहाबाहेरील पोस्टर प्रदर्शन यामुळे ही परिषद सर्वार्थाने यशस्वी झाली. स्मार्ट मटेरियल आणि मॅन्युफॅक्चरिंग ट्रेंडच्या क्षेत्रात ज्ञानाची देवाणघेवाण आणि नवीन उपक्रमासाठी एक व्यासपीठ या राष्ट्रीय परिषदेने उपलब्ध करून दिले.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ फेब्रुवारी २०२५ : व्यवसाय आणि शिक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतीसंबंधी दिशादर्शन या विषयसूत्रावर आधारित राष्ट्रीय परिषदेचे आयोजन.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या शोधाने निर्माण झालेल्या अनेकविध सोयीसुविधांमुळे प्रचंड वेगाने फैलावणाऱ्या या कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांतीचा सर्वच क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा सामना करताना; कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)

आणि मानवी प्रतिभा मिळून चांगल्या भविष्यासाठी हे बदल कशारीतीने सुलभ करू शकतात, व्यवसाय आणि शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना एआय क्रांतीमध्ये तरुण जाण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करून कौशल्य विकासावर लक्ष केंद्रित करावे या उद्देशाने एआयबद्दल स्पष्टता आणि संबंधित क्षेत्रात अंमलबजावणी करण्यासाठी माहिती करून देणे, जागरूकता निर्माण करणे, सहकार्य करणे, नैतिक विचारांना संबोधित करणे, कौशल्य विकासाला प्रोत्साहन देणे, तसेच धोरणात्मक नियोजनासाठी एक व्यासपीठ प्रदान करणे या उद्देशाने विद्या प्रसारक मंडळाच्या डॉ.व्ही.एन. बेडेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तर्फे नेव्हिगेटिंग द ए आय रेव्होल्यूशन फॉर बिझनेस अ‍ॅन्ड एज्युकेशन (NAVIGATING THE AI REVOLUTION FOR BUSINESS AND EDUCATION) या विषयसूत्रावर आधारित राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले.

ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात रिअल टाइम डेटा, विशिष्ट गरजा व भविष्यातील फ्युजन स्ट्रॅटेजिचे महत्त्व यावर भर देत अभ्यासपूर्ण भाषण सादर करून सहभागींचे स्वागत केले. ब्रिम्सचे महासंचालक, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेसंबंधी आव्हाने' याबद्दल आपले विचार मांडले व ब्रिम्स तर्फे प्रकाशित होणाऱ्या 'सृजन' या संशोधन नियतकालिकाचे प्रकाशन करण्यात आले.




परिषदेचे प्रमुख अतिथी, टी जे एस बी बँकेचे अध्यक्ष श्री. शरद गांगल यांनी, तसेच सी डी एस ओ टेक एम – कॉमविवा लिमिटेडचे समूह उपाध्यक्ष श्री. मुकुंद शास्त्री यांनी, 'कृत्रिम बुद्धिमत्ता क्रांती आणि व्यवसाय व्यवस्थापन' या दृष्टीने मार्गदर्शन करणारी उद्बोधक व्याख्याने सादर केली. तसेच एनएमआयएमएस स्कूल ऑफ बिझनेसचे सहाय्यक प्राध्यापक श्री. बिनेश नायर यांनी बीजभाषण सादर केले.




त्यानंतर झालेल्या परिसंवादामध्ये मध्ये महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्शियल सर्व्हिसेसच्या इनोव्हेशन अँड फ्युचर टेक्नॉलॉजीचे प्रमुख श्री. सुरेश शान, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे च्या संचालिका डॉ. मोनिका आपटे, हॅशटेक व्हेंचर्सचे संस्थापक, श्री. नयन भेडा, तसेच यनिशा एक्झिक्युशनचे संस्थापक श्री. यश संघवी या तज्ज्ञांनी सहभाग घेतला व कृत्रिम बुद्धिमत्ते संबंधी आव्हाने, संधी, फायदे, उपाययोजना इ. विषयावर चर्चा केली आणि उपस्थितांना संबोधित केले. ब्रिम्सचे सहा. प्रा. प्रथमेश तावडे यांनी या परिसंवादाचे सूत्रसंचालन केले.




या राष्ट्रीय परिषदेच्या समन्वयक व ब्रिम्सच्या अधिष्ठाता, डॉ. स्मिता जपे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने सकाळच्या सत्राची सांगता झाली.

आयुष्यात पैसा हवा; पण पैशात आयुष्य नको !

परिषदेच्या दुपारच्या सत्रात शोधनिबंध सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले डॉ. सुधाकर आगरकर आणि डॉ. ब्रिजेश शर्मा यांनी परीक्षण केले.

AIGNITE 2025 या आंतरमहाविद्यालयीन सादरीकरण स्पर्धेत विविध संस्थांमधील विद्यार्थ्यांनी त्यांच्या सर्जनशील आणि नावीन्यपूर्ण कल्पना प्रदर्शित केल्या.







संशोधक आणि विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट योगदानाची दखल घेऊन समारोप कार्यक्रम आणि पारितोषिक वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

१ फेब्रुवारी २०२५ : एमएमएस २०२४-२६ तुकडीच्या पहिल्या वर्षाचे विद्यार्थी श्री. यश एन. तेंडोलकर, सिद्धी पुसाळकर यांनी अल्लाना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटतर्फे आयोजित 'उद्योजक २के२५' स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

एमएमएस २०२३-२५ तुकडीची दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनी सरिता गुप्ते हिने ब्रिम्सच्या राष्ट्रीय परिषद २०२५ मध्ये नावीन्यपूर्ण एआय वर आधारित व्यवसायिक सुविधा तयार करण्यावर आधारित स्पर्धा एआय-ग्नाइट २०२५ या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.



३ फेब्रुवारी २०२५ : सहाय्यक प्रा. अदिती दामले-पवार आणि सहाय्यक प्रा. प्रथमेश उ. तावडे यांनी सीआयआय-मुंबई आयोजित एआय इमर्जन सप्ताह कार्यक्रमात भाग घेतला.

९ फेब्रुवारी २०२५: भारत सरकारद्वारे प्रमाणित अग्रगण्य योग संस्था श्री अंबिका योग कुटीर यांनी आयोजित केलेल्या न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर्ससाठी 'योग' या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. पल्लवी चंदवासकर सहभागी झाल्या.

१० फेब्रुवारी २०२५ : डॉ. विभूती सावे आणि सहाय्यक प्रा. हरेश गील यांनी ५ आठवड्यांचा वाधवानी एनईएन इग्नाइट फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम पूर्ण केला व त्यांना प्रमाणित उद्योजकता शिक्षक प्रमाणपत्र मिळाले.

१३ फेब्रुवारी २०२५: डॉ. व्ही.एन. ब्रिम्सच्या आयआयसी समिती तर्फे उद्योजक/स्टार्टअप्ससाठी प्रभावी विक्री आणि विपणन धोरणांवर आधारित तज्ज्ञ वक्ते डॉ. व्ही.एन. ब्रिम्सचे संचालक डॉ. नीतिन जोशी, यांची एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



१४ फेब्रुवारी २०२५: धनबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंडियन स्कूल ऑफ माइन्स) च्या व्यवस्थापन अभ्यास आणि औद्योगिक अभियांत्रिकी विभागाने आयोजित केलेल्या 'विकसित भारत२०४७: वित्त, समावेशन आणि आर्थिक विकासातील नवोन्मेष' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत, महासंचालक

डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक प्रा. प्रथमेश उमेश तावडे यांनी 'अ स्टडी ऑन इकॉनॉमीज ऑफ स्केल अँड स्कोप ऑफ इंडियन इन्कॉर्पोरेशन' या शीर्षकाचा शोधनिबंध सादर केला.

१४ फेब्रुवारी २०२५ : जोशी बेडेकर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सामुदायिक विकास प्रकल्पाचा भाग म्हणून 'माइंडफुल ईटिंग' या विषयावरील कार्यशाळेत भारतीय विरुद्ध पाश्चात्त्य खाद्य संस्कृती : इन्साईट्स फ्रॉम आय के एस ऑफ आयुर्वेद या विषयावरील सत्राचे आयोजन करण्यासाठी डॉ. पल्लवी चंदवासकर यांना व्याख्यात्या म्हणून आमंत्रित करण्यात आले.



१५ फेब्रुवारी २०२५ : एमएमएस २०२३-२५ तुकडीची दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनी सरिता गुप्ते हिने नवी मुंबईतील राजीव गांधी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे झालेल्या इंटर कॉलेज फेस्ट झेस्ट २०२५ मध्ये बिझनेस पिच स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत संपूर्ण मुंबई व उपनगरातून ५० जण सहभागी झाले होते.



२० फेब्रुवारी २०२५ : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी जर्नल क्लब मध्ये फिलिप कोटलर यांनी लिहिलेले मार्केटिंग क्षेत्रातील नवीनतम पुस्तक 'मार्केटिंग ६.०: द फ्युचर इज इमर्सिव्ह' या पुस्तकाचे परीक्षण सादर केले व या क्षेत्रातील नवीनतम घडामोडी सांगितल्या.

२१ फेब्रुवारी २०२५: ब्रिम्सच्या विद्यार्थी विकास समिती तर्फे मातृभाषा दिवसाचे आयोजन करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन हा २१ फेब्रुवारी रोजी भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेची जाणीव करून देण्यासाठी बहुभाषिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, युनेस्कोने जाहीर केलेला व जगभरात साजरा केला जाणारा वार्षिक उत्सव आहे. शिक्षण मंत्रालयाने देखील २१.०२.२०२५ रोजी मातृभाषा दिवस भव्य पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला, जेणेकरून भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेची जपणूक करण्याची उद्दिष्टे साध्य करता येतील.

त्याच अनुषंगाने, ब्रिम्सने 'मातृभाषा दिवस - २०२५' साजरा करण्यासाठी खालील उपक्रमांचे आयोजन केले.

१) आपल्या मातृभाषा जपण्याच्या महत्त्वावर प्रमुख पाहुण्यांचे भाषण

२) 'मातृभाषा' या विषयावर प्राध्यापकांचे विचार

३) विद्यार्थ्यांचे कविता वाचन

४) विद्यार्थ्यांचे मातृभाषेत गीत गायन

५) विद्यार्थ्यांसाठी मातृभाषेवर आधारित प्रश्नमंजुषा आणि शब्द खेळांचे आयोजन





२५ फेब्रुवारी २०२५: सोमैया विद्याविहार विद्यापीठाशी

संलग्न असलेल्या; एस के सोमैया बिझनेस स्कूलच्या आयआयसी समिति तर्फे 'स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा धोरणे' या विषयावरील सत्रात सहभागी होण्यासाठी सहाय्यक प्राध्यापक प्रथमेश उमेश तावडे यांना अतिथी वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले.



२७ फेब्रुवारी २०२५: विद्यार्थ्यांना सक्षम बनवणे या उद्देशाने जिनी ऑफ आन्सर्स उपक्रमाची सुरुवात !

ब्रिम्स येथे आम्ही नेहमीच आमच्या विद्यार्थ्यांना प्रथम स्थान देतो - त्यांचे कल्याण, चिंता आणि आकांक्षा सर्वांत महत्त्वाच्या असतात. आम्ही करत असलेल्या प्रत्येक गोष्टीच्या केंद्रस्थानी हा विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोन ठेवून, विद्यार्थी समुपदेशन कक्षाने, 'जिनी ऑफ आन्सर्स' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे वैयक्तिक, शैक्षणिक किंवा कारकिर्दी संबंधित कठीण प्रश्न मुक्तपणे आणि गुप्तपणे विचारता येतात. याद्वारे, आम्ही त्यांना आवश्यक असलेले मार्गदर्शन, पाठिंबा आणि स्पष्टता कोणत्याही संकोचाशिवाय मिळेल याची खात्री देतो.



## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

**दि.०१ ऑक्टोबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५**

दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी भोंडला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागातर्फे करण्यात आले. खंडेनवमी पूजन कार्यक्रमाचे औचित्य साधून ही स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. निसर्गातील पानाफुलांच्या साह्याने विद्यार्थ्यांनी अतिशय सुबक भोंडले साकारले. आधुनिकतेचा आग्रह धरताना आपली परंपरा आणि संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावी, विद्यार्थ्यांच्या अंगी अवगत असलेल्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु.प्रेरणा शिंदे व कु.श्रावणी मेस्त्री या ग्रुपने पटकावला. द्वितीय क्रमांक कु.इशा हेगिष्टे व कु.अक्षता कदम यांनी, तर तृतीय क्रमांक कु.गौरव तेरेकर व कु.मानस विचारे या ग्रुपने मिळविला. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा.राधिका कदम यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नरेंद्र सोनी, उपप्राचार्य अविनाश पवार, संगणक अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा.केतन कुंडिया व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.



५२ व्या गुहागर तालुका विज्ञान प्रदर्शनात 'कृत्रिम बुद्धिमत्ता : फायदे आणि तोटे' या विषयावर

महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.राधिका कदम यांनी श्रीमती.आर.पी.पी.पालशेतकर विद्यालय, पालशेत येथे अभ्यासपूर्ण सत्र दिले. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षकांना AI ची ओळख करून देणे, त्याचे फायदे आणि आव्हाने अधोरेखित करण्यात आले. प्रा.कदम यांनी AI कसे ऑटोमेशनद्वारे कार्यक्षमता वाढवते, वैद्यकीय निदान सुधारते आणि शिक्षण वैयक्तिकृत करते हे स्पष्ट केले. स्मार्ट उपकरणे आणि तांत्रिक प्रगतीमध्ये AI च्या भूमिकेवरही भर दिला. तथापि, ऑटोमेशन, नैतिक चिंता, एआय सिस्टीममधील पूर्वग्रह आणि तंत्रज्ञानावरील अत्याधिक अवलंबनामुळे नोकरीचे विस्थापन यासह संभाव्य कमतरतांवर चर्चा केली. सत्राचा समारोप संवादात्मक प्रश्नोत्तराने झाला, जिथे भविष्यातील करिअरवर AI चा प्रभाव आणि त्याचे नैतिक परिणाम याबद्दल प्रश्न विचारले. या सत्रासाठी जवळपासच्या शाळांतील ३० विज्ञान शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी एकूण ६८ जण उपस्थित होते.




दिनांक ०९ नोव्हेंबर २०२४ रोजी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाद्वारे नव उद्योजक दिवसाच्या सेलिब्रेशन अंतर्गत विशेष व्याख्यान पार पडले. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून यंत्र अभियांत्रिकी विभाग व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.हृषिकेश भावे उपस्थित होते. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना उद्योग सुरू करण्याचे महत्त्व आणि नवीन उद्योग सुरू करण्यासंबंधी मार्गदर्शनही केले. या कार्यक्रमाला एकूण ५० विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभाग व आयआयसी अंतर्गत ऑनलाईन गुगल मीट द्वारा 'यशस्वी उद्योजकाचे मनोगत' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून प्रगतशील उद्योजक ओंकार खरे उपस्थित होते. या व्याख्यानाला ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली.

दि.२५ नोव्हेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाने ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही पद्धतीने 'NAAC पीअर टीम प्रश्न आणि उत्तर तयारी' या विषयावर एक चर्चासत्र आयोजित केले. जयहिंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. वैशाली ढेडे यांनी आयोजित केलेल्या या सत्राचे उद्दिष्ट प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांना NAAC च्या समवयस्कांच्या प्रश्नांना प्रभावीपणे उत्तर देण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्रदान करणे होते. NAAC मान्यता क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. ढेडे यांनी सात NAAC निकषांमध्ये अंतर्दृष्टी प्रदान केली, ज्यात दस्तऐवजीकरण, भागधारकांचा सहभाग, संशोधन उपक्रम आणि प्रशासन यावर भर देण्यात आला. या संवादात्मक सत्रामुळे सहभागींना शंका दूर करण्यास आणि संस्थात्मक तयारीसाठी मौल्यवान धोरणे मिळविण्यास मदत झाली.

दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी 'उद्योजकता विकास' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा महाविद्यालयातील

कॉम्प्युटर अभियांत्रिकी विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकासात तर्कशक्ती, समस्या सोडवण्याची पद्धत, सर्जनशील विचार आणि निर्णयक्षमता वाढवणे हा या कार्यशाळेचा मुख्य हेतू होता. या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून मूनी लूप्सचे संस्थापक, तसेच महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी, युवा उद्योजिका स्मृती चव्हाण यांनी ऑनलाईन पद्धतीने हे सत्र घेतले. त्यांनी उद्योजकता विकासातील समस्या सोडवण्यासाठी विविध पद्धती आणि नवीन कल्पना शोधण्याचे प्रभावी तंत्र याबाबत सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी त्यांच्या उद्योग प्रवासाबद्दल उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांना भविष्यातील उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहित केले. या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून कॉम्प्युटर विभागाच्या प्रा.राधिका कदम व प्रा.कृष्णा मालठाणकर यांनी काम पाहिले. तसेच महाविद्यालयाचे कॉम्प्युटर विभागाचे विभागप्रमुख प्रा. केतन कुंडिया, उपप्राचार्य अविनाश पवार आणि प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वी संपन्न झाली.

दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजी कनिष्ठ महाविद्यालय शिरगांव व कनिष्ठ महाविद्यालय अलोरे येथे 'ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त' खास जनजागृतीपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाचे प्रा.योगेश काटदरे उपस्थित होते.



दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी आर. सी. काळे ज्युनियर कॉलेज, पेढे परशुराम येथे 'ऊर्जा संवर्धन दिनानिमित्त' खास जनजागृतीपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याता म्हणून महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या प्रा. मीनल साठे उपस्थित होत्या.



दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्रा.स्वानंद जोशी यांचे देवरुख येथील आठल्ये सप्रे पित्रे विज्ञान महाविद्यालयात 'अभियांत्रिकीमधील रोजगाराच्या संधी' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना बारावीची परीक्षा, त्यानंतर सिईटीचे मार्गदर्शन आणि अभियांत्रिकी प्रवेश याबद्दल माहिती दिली. या व्याख्यानाला १२६ विद्यार्थी उपस्थित होते.



दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाच्यावतीने कनिष्ठ महाविद्यालय शिरगांव येथे 'विद्युत सुरक्षितता सप्ताह' या विषयावर एक विशेष कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.योगेश काटदरे यांनी काम पाहिले.

दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या

टीका व विरोध हिच एका समाजसुधारकास मिळालेली बक्षिसे असतात !

विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या वतीने कनिष्ठ महाविद्यालय मार्ग ताम्हाने येथे ‘विद्युत सुरक्षितता सप्ताह’ या विषयावर एक विशेष कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.प्रीती साठे यांनी काम पाहिले.




दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या प्लेसमेंट विभागाद्वारे ‘नागरी सेवांमधील करिअर संधी’ या विषयावर मार्गदर्शन शिबिर पार पडले. या शिबिरासाठी प्रमुख वक्ते म्हणून ब्रॉडवे एज्युकेशन हब, पुणेचे विभागीय प्रमुख डॉ.अमित मेढेकर हे उपस्थित होते. या दरम्यान उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, नागरी सेवा परीक्षेची तयारी करताना विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य व शहाणपण या तीन महत्त्वाच्या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच दैनंदिन व्यवहारातील काही उदाहरणे देऊन त्यांनी अभ्यासात कशाप्रकारे सातत्य राखले पाहिजे यावर सविस्तर विवेचन केले. नागरी सेवेतील परीक्षांचा विचार करताना पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा, मुलाखत हे टप्पे किती महत्त्वाचे आहेत, तसेच नागरी सेवांमधील करिअर संधीचा विचार करताना त्यामध्ये विविध एकूण २४ शाखांचा अभ्यास करता येतो यावर त्यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. त्याचप्रमाणे दैनंदिन मानवी जीवनात मानवी स्कील व व्यवस्थापकीय स्कील किती महत्त्वाचे आहे यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी श्रीमती रखुमाई पांडुरंग पालशेतकर माध्यमिक विद्यालय, पालशेत, तसेच न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज वेळणेश्वर मधील विद्यार्थी, शिक्षक – शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा.हृषिकेश भावे यांनी काम पाहिले. सदर कार्यक्रम यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्रकुमार सोनी, उपप्राचार्य प्रा.अविनाश पवार, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा.जितेंद्र आचार्य, सर्व विभागप्रमुख, शिक्षक शिक्षकेतर सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.



दि.२१ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाचे माजी विद्यार्थी श्री.ओमकार लाड यांनी महाविद्यालयाला भेट दिली. सध्या ते एका आघाडीच्या ऑटोमेशन कंपनीमध्ये कार्यरत असून, त्यांनी ऑटोमेशन क्षेत्रातील करिअर संधी आणि इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकीच्या भविष्यासंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांच्या संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली, तसेच करिअर घडविण्यासाठी मौल्यवान मार्गदर्शन मिळाले.



दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी यंत्र अभियांत्रिकी विभागाच्या श्री. हृषिकेश भावे यांनी महाराष्ट्र पॉलिटेक्निक मंडणगड येथे एक व्याख्यान घेतले. ‘यंत्र अभियांत्रिकी मधील रोजगाराच्या संधी’ हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उपस्थिती लावली. एकूण ६० विद्यार्थी या व्याख्यानासाठी उपस्थित होते.




दि. २१ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक आणि संगणक अभियांत्रिकी विभागाने 'इमर्जिंग टेक्नॉलॉजीज अँड सायबर सुरक्षा' या विषयावर एक कार्यक्रम आयोजित केला होता.  या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते प्रा.गजानन खापरे यांनी एआय, ब्लॉकचेन, आयओटी आणि क्वांटम कम्प्युटिंग सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा सायबरसुरक्षेवर होणाऱ्या परिणामांवर चर्चा केली. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानामुळे सुरक्षा उपाय कसे वाढतात आणि सायबर सुरक्षा आव्हानांना कसे तोंड द्यावे याबद्दल ज्ञान देणे हा होता. सहभागींनी डिजिटल मालमत्ता सुरक्षित करणे, नवीन सुरक्षा प्रोटोकॉल समजून घेणे आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी संबंधित जोखीम कमी करणे यामध्ये मौल्यवान कौशल्ये शिकली. परिणामी, विद्यार्थ्यांना आधुनिक सायबरसुरक्षा पद्धतींची सखोल समज मिळाली आणि पुढील पिढीतील तंत्रज्ञानाच्या सुरक्षा आव्हानांना तोंड देण्यासाठी, विकसित होत असलेल्या सायबरसुरक्षा क्षेत्रात करिअरसाठी त्यांना तयार करण्यासाठी कौशल्ये मिळाली.

दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी  विभागातील विद्यार्थ्यांनी मालणी मार्ट, शृंगारतळी, गुहागर  या स्थानिक उद्योगासाठी वेबसाइट विकास प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक समस्यांवर काम करण्याची संधी मिळाली आहे. या प्रकल्पाची संकल्पना श्री. गजानन खापरे आणि श्री. हृषिकेश भावे यांनी मांडली व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगासोबत कार्य करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यांसह व्यावसायिक अनुभवही समृद्ध होईल. थेट उद्योग समस्यांवर कार्य करणे हा ओबीई (Outcome-Based Education) चा एक महत्त्वाचा भाग असून, हा प्रकल्प विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास हातभार लावेल.




दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यायाचा माजी विद्यार्थी कौस्तुभ वैद्य यांनी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.




दि. २४ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाद्वारे 'Data Science using Python Programming' या विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला. या वेबिनारचे मार्गदर्शन डॉ. क्रांती घाग, सहायक प्राध्यापक डी. जे. संघवी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई यांनी केले. डॉ. घाग यांनी डेटा सायन्सच्या महत्त्वपूर्ण संकल्पनांवर प्रकाश टाकला आणि Python चा वापर करून डेटा विश्लेषण, मशीन लर्निंग आणि डेटा व्हिज्युलायझेशन कशाप्रकारे करू शकतो यावर सखोल माहिती दिली. त्यांनी विविध व्यावहारिक उदाहरणांसह Pythonच्या ताकदीवर चर्चा केली, ज्यामुळे

सहभागींचा दृष्टिकोन बदलला. या वेबिनारमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी, तसेच डेटा सायन्स क्षेत्रात करिअर करण्यास इच्छुक असलेल्या व्यावसायिकांनी भाग घेतला होता. डॉ. घाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागिंनी डेटा सायन्स आणि Python चे महत्त्व समजून घेतले. या वेबिनारचे समन्वयक म्हणून कॉम्प्युटर विभागातील प्रा. कृष्णा मालठाणकर व प्रा. राधिका कदम यांनी काम पाहिले. तसेच महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभागाचे विभागप्रमुख प्रा. केतन कुंडिया, उपप्राचार्य अविनाश पवार आणि प्राचार्य डॉ. नरेंद्र सोनी यांच्या मार्गदर्शनाखाली हा वेबिनार यशस्वी संपन्न झाला.




दि. २५ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाच्या 'जर्नल क्लब' उपक्रमांतर्गत प्रा.ललन कुमार यांनी कृषी क्षेत्रातील IoT अनुप्रयोग या विषयावर संशोधन-पत्र सादर केले. या सत्रात प्राध्यापकांनी कृषी क्षेत्रातील IoT तंत्रज्ञानाच्या उपयोगांविषयी महत्त्वपूर्ण चर्चा केली. हा उपक्रम ज्ञानवर्धक व उपयुक्त ठरला.



दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांची तालुक्यातील नामांकित 'पेठे ब्रेक मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड, मोडकाआगर, गुहागर' या कंपनीत औद्योगिक क्षेत्र भेट देण्यात आली.




दिनांक २७ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान महाविद्यालयातील यंत्र अभियांत्रिकी विभागाने तीस तासांचे value added वर्कशॉप आयोजित केले होते. 'ॲडव्हान्स एक्सेल विथ आर्टिफिशियल इंटेलिजन्स' हा या व्याख्यानाचा आणि वर्कशॉपचा विषय होता. मुंबई येथील श्री. संतोष कारखानीस यांनी हे वर्कशॉप घेतले. या वर्कशॉपला ५० हून अधिक विद्यार्थ्यांनी आणि काही शिक्षक, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.



दि.३१ जानेवारी २०२५ रोजी, इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाने फ्रॉम आयडिया टू इम्पॅक्ट: स्टार्टअप्समध्ये समस्या-समाधान फिटसाठी नवोन्मेष धोरणांचे प्रमाणीकरण या शीर्षकाचा ऑनलाइन वेबिनार

आयोजित केला. प्रा.अपर्णा मुरकर यांच्या समन्वयाने झालेल्या या सत्रात टेक्नोसिग्नलाचे संस्थापक, व्हिसाचे वरिष्ठ सॉफ्टवेअर अभियंता आणि ह्यूमन क्लाउडचे तांत्रिक संचालक श्री. मल्लिनाथ पर्तनाले उपस्थित होते. वेबिनारने स्टार्टअप कल्पनांचे प्रमाणीकरण, समस्या-समाधान फिट फ्रेमवर्क, नवोन्मेष आव्हानांवर मात करणे आणि वास्तविक-जगातील केस स्टडीज याबद्दल मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान केली. विद्यार्थी, प्राध्यापक आणि व्यावसायिकांसह सहभागींना स्टार्टअप नवोन्मेष धोरणे आणि सर्वोत्तम पद्धतींची सखोल समज मिळाली. या सत्राने इच्छुक उद्योजकांना त्यांच्या कल्पना सुधारण्यासाठी आणि यशस्वी नवोन्मेष आणि वाढीसाठी प्रभावी वैधता तंत्रे लागू करण्यास प्रेरित केले.




महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने सर्व स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी 'STAAD प्रो सॉफ्टवेअर' वर ४० तासांची मूल्यवर्धित कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण केली. विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री.अनिकेत जाधव यांनी कार्यशाळेसाठी संसाधन व्यक्ती म्हणून प्रमुख भूमिका पार पाडली. कार्यशाळेत स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहाय्यक प्राध्यापक श्री मंदार पावरी आणि श्री संजीव रहाटे यांनी कार्यक्रमाचे संपूर्ण उपक्रमाचे संयोजन केले.

दि.३१ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.भक्ती घोरपडे यांनी सह्याद्री पॉलिटेक्निक, सावर्डे येथे 'रिमोट सेन्सिंग आणि ॲप्लिकेशन्स' या विषयावर अतिथी व्याख्यान पार पडले. संपूर्ण सत्रात एकूण ०२ प्राध्यापक आणि २६ विद्यार्थी उपस्थित होते




दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी, न्यू इंग्लिश स्कूल, तळी, गुहागर येथील अटल टिंकरिंग लॅबमध्ये महाविद्यालयातील संगणक व उपकरण अभियांत्रिकी विभागातील प्रा. ललन कुमार, प्रा.राधिका कदम आणि प्रा.कुणाल किशोर यांनी भेट दिली. या सत्रात प्रा.ललन कुमार यांनी विद्यार्थ्यांना 'ट्रॅफिक लाईट कंट्रोलर आणि LED लाईट ब्लिंकिंग' या Arduino प्रोजेक्ट्सचे प्रात्यक्षिक दिले. इयत्ता ७ वी ते ११ वी तील एकूण ४० विद्यार्थी व तीन शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी Arduino प्रोजेक्ट्स शिकण्यास विशेष रुची दर्शवली. शाळेच्या व्यवस्थापनाने भविष्यात दर महिन्याला दोन टिंकरिंग लॅब सत्र आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली.



दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाच्या वतीने 'The Evolution of Optical Fiber Communication: Unlocking Innovation and Growth' या विषयावर राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या ऑनलाईन सत्रात डॉ.दमयंती घारपुरे या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. या वेबिनारमध्ये ऑप्टिकल फायबर कम्युनिकेशनच्या विकासाचा इतिहास, तांत्रिक प्रगती, औद्योगिक उपयोग आणि भविष्यातील संधी यावर सखोल माहिती देण्यात आली. डॉ. घारपुरे यांनी दूरसंचार, आरोग्य सेवा आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर यांसारख्या क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावावर प्रकाश टाकला. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरांचा भाग झाला, जिथे विद्यार्थ्यांनी आणि संशोधकांनी मार्गदर्शन घेतले. एकूण ३१५ हून अधिक सहभागींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.अविनाश पवार व विभागप्रमुख प्रा.गजानन खापरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे वेबिनार यशस्वीपणे संपन्न झाले.




दिनांक १८ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकी विभागाच्या प्रा.राधिका कदम यांनी राजाराम शिंदे पॉलिटेक्निक, पेढांबे येथे भेट देऊन 'कृत्रिम बुद्धिमत्तेतील नव्या प्रवृत्ती' या विषयावर माहितीपूर्ण सत्र घेतले. या सत्राला ३४ डिप्लोमा अंतिम वर्षाचे विद्यार्थी आणि तीन प्राध्यापक उपस्थित होते. तसेच, विद्यार्थ्यांना PRAKALP २०२५ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.




दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाच्यावतीने राबिया शेख अहमद नाखवा ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, पावस येथे 'स्मार्ट लॉजिक विथ PLC: इनोव्हेटिंग डिजिटल सर्किट्स' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील प्रा.गौरी जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेत PLC तंत्रज्ञानाची ओळख, त्याचे औद्योगिक ऑटोमेशनमधील महत्त्व आणि पारंपरिक सर्किट डिझाइनच्या तुलनेत त्याचे फायदे यावर चर्चा झाली. AND, OR, NOT, NAND, NOR, XOR आणि XNOR गेट्स PLC च्या सहाय्याने कसे कार्यान्वित करता येतात याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. लॅडर डायग्रामसह लॉजिक गेट्सची प्रत्यक्ष अंमलबजावणी व औद्योगिक ऑटोमेशनमधील PLC वापराबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.



दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्यावतीने डिझाईन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग आणि इनोव्हेशन डिझाईन या एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी प्रमुख वक्ते म्हणून ऑर्कल इंडिया कंपनीचे सॉफटवेअर डेव्हल्पर श्री. उदय दिवे लाभले.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाच्यावतीने गोवा तंत्रनिकेतन महाविद्यालय, बिचोलीम येथे 'Exploring ESP32 - Powering the Future of IoT and Automation' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील प्रा. गौरी जोशी यांनी ESP32 च्या कार्यप्रणाली, तांत्रिक वैशिष्ट्ये, GPIOs, वाय-फाय, ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी, तसेच प्रोग्रॅमिंग (Arduino IDE, ESP-IDF, MicroPython) याविषयी सखोल माहिती दिली. लाईव्ह डेमोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कोडिंगचा अनुभव देण्यात आला.

दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा. प्रीती साठे-भोळे यांचे शासकीय तंत्रनिकेतन, डिचोली (गोवा) येथे PLC, Ladder Logic या विषयावर एक विशेष सेमिनार संपन्न झाले.

दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक अभियांत्रिकी विभागाच्यावतीने गोवा तंत्रनिकेतन महाविद्यालय, पणजी येथे 'ESP32 - एक शक्तिशाली IoT मायक्रोकंट्रोलर' या विषयावर तज्ज्ञ सत्र मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील प्रा. गौरी जोशी यांनी विद्यार्थ्यांना ESP32 ची तांत्रिक वैशिष्ट्ये, वाय-फाय व ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी, कमी वीज वापर, GPIOs आणि IoT क्षेत्रातील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. Arduino IDE, ESP-IDF आणि Micro Python यांचा वापर करून ESP32 प्रोग्रॅमिंगचे प्रत्यक्ष डेमो देखील विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.



दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाच्या वतीने 'Quantum Superposition' या विषयावर वेबिनार संपन्न झाले. या वेबिनारसाठी प्रमुख वक्ते म्हणून महाविद्यालयातील प्रा.अमित जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील प्रा. प्रीती साठे-भोळे यांचे शासकीय तंत्रनिकेतन, पणजी (गोवा) येथे 'PLC, Ladder Logic' या विषयावर एक विशेष सेमिनार संपन्न झाले.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.